# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 106/2023 दिनांक : 12.03.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :—

**माळाकोळी :—** दिनांक 09.03.2023 रोजी 19.00 वा. चे सुमारास, **मौजे रिसनगाव आरोपीचे घराचे अंगनात ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी फिर्यादीस जागेचा वाद मिटवून टाकूत म्हणून फिर्यादीस आरोपीतांनी घरी घेवून गेले तेथे जागेच्या वादावरून फिर्यादीस तू पाहुण्याचे बाजूने बोलत आहेस म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करून फिर्यादीचे डोक्यात लोखंडी गजाळीने मारून गंभीर दुखापत करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी मारोती बापूराव केजगीर, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. केजगीरवाडी ता. पालम जि. परभणी** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरन 31/2023 कलम 307,323,504,34 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री आडे, मो.क्रं. 9970125563** हे करीत आहेत.

## 2)दरोडयाची तयारी :—

**नांदेड ग्रामीण :—**दिनांक 11.03.2023 रोजी 01.05 वा. चे सुमारास, **ग्रामीण तंत्रनिकेतन कॉलेज ते असदवन वाघाळा जाणारे रस्त्याचे बाजुस गुरूकुल इंग्लिश स्कुल च्या पाटीजवळ, नांदेड येथे,** यातील नमुद 04 व ईतर दोन फरार आरोपीतांनी नमुद ठिकाणी अंधारात दबा धरून रोडवरुन येणारे जाणाऱ्या प्रवाशांवर दरोडा टाकण्याचे व दरोडयाचे तयारीत असताना दोन पिस्टल देशी कट्टे (अग्निशस्त्र), 17 जिवंत काडतुस, दोन खंजर, लाल मिरची पावडर व नायलोनची दोरी, दोन मोटार सायकल, मोबाईल असा एकुण 1,45,000/—रूपयाचे मुद्देमालासह शस्त्र बाळगुन दरोडा घालण्याचे तयारीत असताना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री राजेश नारायण डाकेवाड, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 39/2023 कलम 399,401,402 भादवि सह कलम 3/25, 4/25 शस्त्र अधिनियम 1959 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री बालाजी नरवटे, मो. नं. 8149863325** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :—

**कंधार :—** दिनांक 10.03.2023 रोजी 14.00 वा. ते 16.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी मौजे गोणार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीबाई ही घरास कुलूप लावून शेताकडे गेली असता घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून कपाटामध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने व नगदी असा एकुण किंमती 50,000/—रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला आहे. वगैरे **फिर्यादी वंदना गंगाधर कांबळे, वय 54 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. गोणार ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरन 66/2023 कलम 454,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1959 व्यवहारे, मो.क्रं 9604333256** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :—

**1)वजिराबाद :—** दिनांक 08.03.2023 रोजी 10.30 वा. ते 21.30 वा. चे दरम्यान, **राज ऑप्टीकल डॉ. लाईन वजिराबाद, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो कंपणीची मो. सा. क्रमांक एमएच—26/एएक्स—0680 किंमती 30,000/—रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी माधव नारायण देशमुख, वय 39 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. कलंबर बु. ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 77/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1824 केंद्रे, मो. क्रं. 9970381047** हे करीत आहेत.

**2)लोहा :—** दिनांक 10.03.2023 रोजी 10.30 वा. ते 12.30 वा. चे दरम्यान, **पोलीस स्टेशन येथील मेन गेट समोरून लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे मित्राचे नावे असलेली होंडा युनिकॉर्न कंपनीची मो. सा. क्रमांक एमएच—26/बीवाय—5616 किंमती 60,000/—रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात दोन चोरटयांनी चोरून नेली. वगैरे **फिर्यादी ज्ञानेश्वर यादव गंदेवाड, वय 27 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. बारड ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरन 57/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1754 के. जे. सुर्यवंशी, मो. क्रं. 7057524134** हे करीत आहेत.

**3)माहुर :—** दिनांक 10.03.2023 रोजी 20.00 वा. ते 23.00 वा. चे दरम्यान, **सोनापीर बाबा दर्गा समोरून, माहुर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो कंपनीची मो. सा. क्रमांक एमएच—29/एएक्य—7671 किंमती 20,000/—रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी अब्दुल रहिम अब्दुल गफुर, वय 60 वर्षे, व्यवसाय फळ विक्रेता रा. मधुकर नगर, पुसद ता. पुसद जि. यवतमाळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहुर** गुरन 27/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/79 राठोड, मो. क्रं. 8999149220** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :—

**माळाकोळी :—** दिनांक 09.03.2023 रोजी चे 01.00 वा. चे सुमारास, **मौजे पातळगंगा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस थापड बुक्यांने मारहाण करून फिर्यादीचे डाव्या अंगठयास चावा घेवून गंभीर दुखापत केली व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी बालाजी सटवा जकलवाड, वय 50 वर्षे, रा. पातळगंगा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं 30/2023 कलम 325, 323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2504 कदम, मो.क्रं. 8208061818** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :—

**1)शिवाजीनगर :—** दिनांक 10.12.2022 रोजी चे 22.00 वा. ते दिनांक 11.03.2023 रोजी चे दरम्यान, **गंगानगर ता. जि. हिंगोली ह.तु. दत्तनगर सिध्देश्वर यांचा वाडा, नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुला पहिली मुलगी आहे व दुसरीही मुलगीच होणार आहे असे म्हणुन तसेच कार घेण्यासाठी माहेरहुन पंधरा लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व मानसीक छळ केला व पोटातील लेकरासकट जाळुन मारतो असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 28 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 78/2023 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/882 सुर्यवंशी, मो.क्रं. 9421870108** हे करीत आहेत.

**2)लिंबगाव :—** सन 2009 ते दिनांक 22.11.2022 रोजी चे 07.00 वा. चे दरम्यान, **मौजे मरळक ता. नांदेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु घरात बरोबर वागत नाही तुला स्वयंपाक येत नाही तसेच मोटार सायकल घेण्यासाठी माहेरहुन एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व मानसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 35 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 39/2023 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/706 पवार, मो.क्रं. 9373545955** हे करीत आहेत.

## 7)शासकीय आदेशाचे उल्लंघन :—

**मुदखेड :—**दिनांक 10.03.2023 रोजी 17.30 वा. ते 21.15 वा. चे दरम्यान, **मुदखेड शहरात ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद बारा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या ट्रॅक्टर क्रमांक एम.एच.—26/व्ही—8110 वर साऊंड सिस्टिम लावून त्याचा उच्च आवाज करीत मोठया आवाजाने गाणे वाजवून आरडा ओरड करीत आदेशाचे उल्लंघन करीत मा. जिल्हाधिकारी साहेब नांदेड यांचे जमावबंदी व शासकीय आदेशाचे उल्लंघन केले आहे. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री कमल विश्वनाथ शिंदे, ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 46/2023 कलम 188 भादवी सह कलम 134,135,136 मु. पो. का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/2336 मुंडे, मो.क्र. 9403330030** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 107/2023 दिनांक : 12.03.2023**

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"यशवंतराव चव्हाण"** यांची जयंती साजरी

12 मार्च, 2023 रविवार रोजी **"यशवंतराव चव्हाण"** यांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात. **मा. श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली. या प्रसंगी **पोनि श्री एन.एल.रिठ्ठे,** पोलीस कल्याण विभाग, नांदेड यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून **"यशवंतराव चव्हाण"** यांना अभिवादन केले. या प्रसंगी **श्री नागोराव कुंडगीर,** पोउपनि पोलीस नियंत्रण कक्ष, नांदेड यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **पोहेकॉ/संजय सांगवीकर, पोकॉ/विनोद भंडारे, मपोकॉ/शामका पवार,** यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

